२२/११/२००७

ती. सौ. वर्षा व ती. दिलीपरावं यांसी सा. न. वि. वि.

खरं तरं ह्यावेळी दिवाळीच्या पूर्वसंध्येलाच पत्र लिहणार होतो. २-३
पत्र लिहिली, पण ~~आणि~~ तोचतोच मजकुर पत्रांमध्ये येत राहिला. मग
विचार केला की आता "केरळ दर्शन" झाल्यावरच पत्र लिहावे म्हणजे जरा
मला आणि तुम्हालाही मजा येईल. शेवटी काय तर पत्र लिहणे म्हणजे
एक सुखद आनंदच असायला हवा. तर मग आता केरळ प्रवचन सुरु करतो.
पाडव्याच्या पहाटेला इथूनच दिल्ली-कोचीन मंगला एक्सप्रेसने ५.४५ वा. प्रवास
सुरु झाला. अमित व सौ. प्रचीती पहाटे ४.३० वा. नाशिकरोड स्टेशनवर
पोहचले होते. ट्रेनपण वेळेवर होती. आपल्या गल्लीतीलच रिक्षावाला असल्यामुळे
आरामात स्टेशनवर पोहोचलो. सकाळी ९.३० ला पनवेलला अमितचा मावस
भाऊ (वय ६१) व त्यांची सौभाग्यवतीपण आम्हाला येऊन भेटले. शैलेश, मीनल
अद्वैत व आर्या विमानाने अगोदरच कोचीनला पोहचले होते. साधारणत: २९
तासांचा प्रवास करून आम्ही कोचीन इथे पोहचलो. प्रवास दिवसा असल्याने
कोकणातील निसर्गाचा आनंदपण मिळाला. प्रवासात भरपूर थट्टामस्करी, गप्पा, पत्ते
इ. झाल्यामुळे मजा आली. कोचीनला टेम्पो ट्रॅव्हलर (१४ सिटर) अगोदरच ठरवली
असल्यामुळे त्याने आम्ही हॉटेलवर पोहचलो. मग आंघोळ. तोपर्यंत शैलेश आम्हाला
Join झाला. मग जेवण व लगेच साईट सिईंग. कोचीनमधील म्युझियम, डच पॅलेस,
बघितले व 'मरीन ड्राईव्ह' वर बोटींगमधून सूर्यास्त बघितला. कोचीन फोर्टवर
'चाईनिज फिशिंग नेटपण' बघितले. दुसऱ्या दिवशी (१२/११) कोचीनहून
'गुरुवायुर' इथे गेलो. इथे श्रीकृष्णाचे मंदीर आहे. पुरुषांनी फक्त लुंगी व
बायकांनी साडी घालूनच दर्शन घ्यावे लागते. मोबाईल घेऊनपण आत येत नाही.
मंदीर स. ११.३० ते १२.३० वा. बंद होते. आम्ही ११ वा. रांगेत, पण नंबर लागला.

मंदीर चांगलेच आहे. त्यानंतर मंदीराच्या आवारातील एका हॉटेलमध्ये केरळी जेवण घेतले. मग थोडीशी खरेदी. तिथुन जवळच असलेल्या elephant Park मध्ये गेलो. एकदर ६५ हत्ती आहेत. कार्तिक एकादशीला (म्हणजे आजच) ह्या सर्व हत्तींना सजवुन त्यांची गुरुवायुर मंदीरापर्यंत मिरवणूक निघते. आपल्याकडे जसे गाईला महत्व आहे त्याप्रमाणे केरळात हत्तीला आहे. पार्कनंतर जवळच असलेल्या "चालकुडी" ह्या गावावरुन 'अथिरापल्ली" इथे पोहचलो. अतिशय नयनरम्य असे पाण्याचे २-३ धबधबे इथे आहेत. शिवाय अतिशय सुंदर आणि नाशिक मधील सोमेश्वरची आठवण होईल अशी नदी आहे. ह्या नदीच्या काठावरुन कडेकडेने चालत जातांना खूपच गंमत वाटली. तिथुन मग परत कोचीनला हॉटेलवर परतलो. दुसऱ्या दिवशी सकाळी कोचीनहून "मुन्नारला" प्रयाण केले. केरळमधील मुन्नार हे साधारणत: ६५००-८००० फूट उंचीवरील थंड हवेचे ठिकाण (हे मग तिथे गेल्यावरच समजले) कोचीन-मुन्नार हे साधारणत: १२५ कि.मी. अंतर. जातानाच स्पाईसेस गार्डन (केरळमध्ये ह्या अनेक ठिकाणी आहेत), रस्त्यावरच 'नेरीयामंगलम' येथे एका नदीवर असलेला जुना, अरुंद पण देखणा असा पूल, महाबळेश्वरच्या Points प्रमाणे Kafadippara एक सुंदर निसर्गाचा देखावा, एक-दोन धबधबे (देवीकुलम व कुंडला) हे सव पहात सकाळी साडेसातला निघालेलो आम्ही दुपारी १२ पर्यंत मुन्नारला पोहचलो. मग लगेच आसपासील साईट्सची माहिती हॉटेल मालकाकडून घेतली. मुन्नारला ३ दिवसांचा मुक्काम असा लागला. कारण मुन्नारच्या वेगवेगळ्या दिशांना भरपूर पाहण्यासारखे. जेवण करुन आम्ही लगेच 'राजमाला' इथे पोहचलो. केरळ S.T. च्या इथे गाड्या आहेत. साधारणत: ३० कि.मी. अरुंद रस्त्याने गाड्या चढत जातात. तिथे उतरुन चालुन ३ कि.मी. पर्यंत चालत, भयंकर मजा आली. हे केरळातील बहुधा सर्वात उंच ठिकाण (नाव अनामुडी) स्वीत्झर्लंडला (मी पाहिलेले नाही) शोभेल असा निसर्ग.

खाली आल्यावर चहा. केरळात खरं तर कॉफीच प्याली जी छान असते. चहा मात्र अगदीच अगोड आणि पांचट. नाश्त्यामध्ये डोसा-इडली आणि 'अप्पम'. मेदुवडा आणि उपमा मात्र कुठेच मिळत नाही. जेवणात दही-भात, फ्राईड राईस उत्तम. उत्तर भारतीय डिशेसपण मिळतात पण त्यात मजा नाही. नॉनव्हेजवाल्यांना मासे, चिकन, अंडं आदी चांगलं मिळतं. इथे प्रत्येक हॉटेलमध्ये गरम पाणी (औषधी पिवळ्या रंगाचे) मिळते. जेवणात स्वच्छ चटेर (आपल्यासारखे दोन नाही), चमचे आणि कांदा-लिंबू मागितल्याशिवाय मिळत नाही. पाणीसुद्धा जो मागेल त्यालाच मिळेल.

राजमालाहून परतल्यावर ग्रुपमधील चार 'कलावती' अथवा 'बॉईलर' अथवा 'रंभा-उर्वशी...' (हे नाव अमितने दिलेलं) ह्यांची चहा-काजू-वेलदोडे वगैरे खरेदी. आमच्या ड्रायव्हरच्या सूचनेप्रमाणे मसाल्याचे पदार्थ घेतले नाहीत, ते 'थेक्कडी' ह्या ठिकाणी चांगले मिळतात.

रात्री मग आमच्याच रूमवर सारे जमलो. मीनलने सुरुवात करून प्रत्येकाने गाणी म्हटली. मग गप्पा, अमितच्या नकला इ. पुष्करनेपण गाणे म्हटले.

दुसऱ्या दिवशी मुन्नारच्या दुसऱ्या दिशेचे साईट सिईंग. त्या दिवशी आम्ही मेट्टूपेट्टी व अजून एक लेक (कुंडाळा) पाहिला. शैलेश, मी व अद्वैतने कुंडाळा लेकवर Pedal Boating केले. शैलेश, अद्वैत व आर्याने हत्तीवरून दमजल केली. साधारणतः Echo point हा उंचावर असतो. इथला मात्र तळ्याच्या कडेला आहे. ही सर्व ठिकाणे खूपच सुंदर. दुपारी मुन्नारला येऊन "सरवणा" ह्या हॉटेलमध्ये केळीच्या पानावर दिलेले केरळी जेवण. नंतर लगेच टाटा टी ह्या ~~कंपनी~~ फॅक्टरीला भेट. तिथे चहाच्या पानापासून चहा कसा तयार होतो ह्याचा live show. मजा आली. तिथून लगेचच जवळ असलेल्या Blossom Park मध्ये गेलो. अतिशय सुंदर फुले-झाडे आहेत. सोबतच्या डिजीटल कॅमेरात त्यांना बंदिस्त केले. संबंध ग्रुपमध्ये भरपूर फोटो काढले पण शेवटी प्रत्यक्ष पाहण्यात मजा काय ती वेगळीच. तिथून जवळच असणाऱ्या ~~[illegible]~~ पोइंटहून पाईंखर गेलो. गाडी जाऊ शकत नसल्याने १.५-२ कि.मी. पाई रपेट मग चहा-कॉफी वगैरे. Blossom Park मध्ये सगळ्यांनी लगोरी करत पकडापकडी खेळली. शैलेश व प्राची ह्यांची लगोरी लक्षात जोगी (हसवणारी). लहानपणीच्या इथे परत

(1) वाटेत एका Spice गार्डनला भेट. इथे भरपूर आयुर्वेदीक औषधी आहेत. केरळमध्ये भरपूर आयुर्वेदाचा प्रसार व वापर आहे.

---

दोन दिवस मुन्नारला निसर्गाचा आनंद घेऊन मग आम्ही "vagamon" ह्या अजुन एका थंडलेच्या ठिकाणी जाण्यासाठी निघालो Tempo-Travel ~~A/c~~ A.C. असला तरी इथे त्याची गरजच भासली नाही. सकाळी ७ वा. निघालो. रस्ता पूर्ण घाटाचा, नागमोडी, डोंगराळ. पण सर्व डोंगर चहाच्या मळ्यांनी हिरवेगार असे नटलेले. रस्ता अरुंद पण वाहतुकीला मात्र शिस्त, ड्रायव्हरच्या शिविगाळ वैगेरे अजिबात नाही. केरळमध्ये आम्हाला जाणवलं ती म्हणजे स्वच्छता, रस्तावर कुठेही भिकारी नाही. दुसरं म्हणजे एक गांव केव्हा संपत आणि दुसरं केव्हा सुरु होत ते समजतच नाही. चहाच्या मळ्याच्या साधारणत: ५० कि.मी. प्रवास झाल्यावर वेलदोड्याची झाडं सर्व रस्ताच्या अंगाला, त्यामुळे हिरवागार. खरतंर आम्ही "थेकाडी' इथे (वन्यपशू?) पाहाण्यासाठी चाललो होतो. पण सीझनमुळे राईड मिळणार नाही हे मुन्नारलाच कळले होते पण शेवटी एक आशा अर्थात तिथे गेल्यावर तिकिटे मिळालीच नाही. मग एका जैन हॉटेलमध्ये गुजराथी-मारवाडी थाळीचे जेवण व थोडीशी खरेदी (मसाल्यांची) करुन 'वॅगमनला' निघालो.(1) हा तसा ~~[struck]~~ खूपच रिमोट भाग. इथे आमचे एका रिसॉर्टला बुकींग होते. संध्याकाळ झाल्यामुळे आम्ही लगेच जवळच्याच टेकडीवर पोहचलो. सुंदर निसर्गाचा पुन्हा अनुभव. रात्री (कुके?) घेऊन Resort वरच्या गच्चीवर शेकोटीच्या सानिध्यात व हिंदी-मराठी गाण्यांवर नाच मजा आली. एक मोठं गुजराथी कुटुंबपण आमच्या बरोबर होत. थेकाडीची राईड न मिळाल्यामुळे थोडीशी नाराजी सगळ्यांमध्येच होती. पण नंतरच्या प्रवासात ती नाहिशी झाली. एक म्हणजे नंतर बरेच पर्यटकांकडून त्यांनाही तिकिटे मिळाली नसल्यामुळे, त्या सर्वांनाही बघता आले नाही. आणि ज्या थोड्यांनी बघितली त्यांनी एखादं हरण. एखादा हत्ती दिसला ~~[struck]~~ असं सांगितलं. वाढत्या पर्यटनामुळे प्राणी आता बहुतेक ठिकाणी दिसत नाहीत हे खरे.

नंतरच्या दिवशी सकाळी न्याहरी करुन आम्ही 'कोट्टयम' कडे निघालो. हे अंतर १५० कि.मी.

आमचा सर्वच मधला प्रवास वातानुकूलीत टेम्पो ट्रॅव्हलरमधूनच होता. १४ सीटर गाडीत आम्ही ११ लोकं. त्यामुळे मागे सामान आरामात ठेवुन ऐसपैस प्रवास होता. ड्रायव्हर पण चांगला होता. कधीही गाडी लॉक करुन आत नसे. त्याला कुठलही व्यसन नव्हतं. अखंड प्रवासात त्याने कधीही आमच्याकडे एक पैसाही मागितला नाही. आमच्या गप्पाटप्पा मौजमजा सुरु असतांना एकही शब्द न बोलता धीरगंभीरपणे तो वाहन चालवत असायचा. आमच्या फराळातील तो फक्त लाडू आवडीने खायचा. नेहमी हसतमुख व तैयार.

'कोट्टायम' केरळमधील त्यापारी गांव बहुतांशी येथील नागरीक ख्रिश्चन धर्माचे व पैसेवाले. केरळमध्ये साधारणत: ३५-४०% हिंदु, उत्तर केरळातील 'कालिकत' जवळ मुस्लीम जास्त. सर्वांवर कम्युनिस्ट राजवटीचा प्रभाव, त्यामुळे ट्रेड युनियनस् फारच प्रभावी आहे. त्यामुळे बाजारपेठ सकाळी १०-१०.३० नंतर व रात्री ८.०० लाच बंद. हॉटेलमधील, दुकानांमधील नोकर मंडळी काहीशी कामचुकार व उद्दटच वाटली.

दुपारच्या जेवणानंतर व विश्रांतीनंतर "कुमारकम" येथील 'वेंबनाड' नाव असणाऱ्या लेक ह्या साधारण ३५ कि.मी. असणाऱ्या ठिकाणी पोहचलो. या ठिकाणी केरळमधील प्रसिध्द अशा बॅकवॉटरमधील बोट राईड करायला मिळते. १, २ व ३ तास अशी सफर आपण करु शकतो. राईड दोन प्रकारची आहे: १) village १ तास व लेक १ तास मिळून २) आलेप्पीची राईड. बॅकवॉटर ही केरळला लाभलेली आगळी एक नैसर्गिक देणगीच आहे. इथे मोटरबोट किंवा हाऊसबोट घेऊन राईड करता येते. दोन्हीही सुरेख. काही लोक थेट कोट्टायमहून ६ तासाची राईड करतात. आम्ही २ तासांची व्हिलेज व लेक अशी मोटरबोटमधुन राईड केली. ही राईड अविस्मरणीयच. तिथुन मग कोट्टायमला रात्री परत आलो.

१८/११ ला सकाळी कोट्टायमहून त्रिवेंद्रम हा प्रवास झाला. अंतर १५५ कि.मी. रस्ता अतिशय रहदारीचा आणि त्यामुळे कंटाळवाणा. त्यातच आमच्या आजीचे [illegible] [illegible]. त्रिवेंद्रममध्ये प्रथम न जाता आम्ही थेट 'कोवालम' बीचवर गेलो. बीच छोटा पण स्वच्छ. बीचवरच्या हॉटेलमध्ये जेवण. जेवणानंतर शैलेशचे विमान होते त्यामुळे ते सर्व Airport ला गेले.

आम्ही बीचवर यथाभ्यास करून संध्याकाळी हॉटेलवर त्रिवेंद्रमला पोहचलो. आता मात्र अद्वैत, आर्या ह्यांची अनुपस्थिती जाणवायला लागली. चहा घेऊन लगेच त्रिवेंद्रममधील 'पद्मनाभाच्या' मंदीराला भेट दिली. फुल्ल लुंगी. नंतर window shopping. मग जेवण. दुसऱ्या दिवशी सकाळी 'कन्याकुमारी' दर्शन. ते तामिळनाडूमध्ये आहे. इथे आम्हाबरोबर धारा सुरु. वाटेवर असलेल्या 'सुचिंद्रपुरम' ह्या मंदीराला लुंगी लावुन दर्शन घेतले. हे पण सुंदर आहे. मग थेट कन्याकुमारीच्या विवेकानंद रॉकसवर. खूपच सुरेख आहे. तीन समुद्राच्या संगमावर आणि भारताच्या दक्षिण टोकावर गेल्यावर एक वेगळेच feeling. स्मारकाच्या तळाजवळ ध्यानधारणा आणि काही पुस्तके विकत घेतली. इ. स. २००१ मध्ये ह्या स्मारकाजवळच एक उंच असा पुतळा ~~आहे~~ बांधला आहे. चांगला आहे. तिथुन मग जेवण व दु. ४.०० वा. कन्याकुमारीच्या मंदीराचे दर्शन घेतले. तिथुन बीचवर. मी आणि गोडबोले सोडुन बाकी सर्वांनी बीचवर पाण्यात जाऊन समुद्राच्या लाटांचा आनंद घेतला. रविवार दि. १८/११ च्या संध्याकाळी असंख्य लोकांच्या समवेत अतिशय विलोभनीय असा सूर्यास्त बघितला. कॅमेरातपण चांगला टिपला गेला आहे. परत त्रिवेंद्रमला जाताना गाण्यांच्या भेंड्या जकला आदी. मजा आली.

दि. १९/११ ची स. १० ची ट्रेन, श्री. व सौ. गोडबोले कुटुंब विमानाने परतले. परतीच्या प्रवासात ड्रॉवर गप्पा, पत्ते आदि करत साधारणतः ३१ तासाच्या प्रवासानंतर ठाण्याला उतरलो. अमित, प्रज्योती शैलेशकडे गेले. आम्ही खोपटवरून मंत्रालय-नाशिक २×२ एशियाडमधुन मागच्या सीटवर बसुन १०.३० ला नाशिकला पोहचलो.

दहा दिवस संपले हे कळलेच नाही. नाशिकला आल्यावर रूटीन सुरु.

बऱ्याच दिवसांनी एवढे मोठे पत्र लिहिल्यामुळे जरा बरे वाटले. शेवटी पत्राची मजा मोबाईल मध्ये नाही. आजच्या 'जुनं ते जुनं, नवं ते सोनं' ह्या युगात पत्रासारखे 'जुनं ते सोनं' असे काही आहेच हे खरे.

सौरभला सप्रेम नमस्कार

आपला
शिरीष